जनसंपर्क अधिकारी कार्यालय, ठाणे शहर पोलीस
P.R.O. OFFICE, CRIME BRANCH, THANE CITY
Address- Office of Commissioner of Police, Thane City,
Near Kalawa Bridge, Thane West Maharashtra -400601
Email Id- cp.thane.pro@mahapolice.gov.in Contact No: +919819208279

प्रेस नोट क्रमांक - **दिनांक - १४/०५/२०२६**

गुन्हे शाखा, घटक - २, भिवंडी ची कामगिरी

"खुनाच्या गुन्हयाचा कौशल्यपुर्ण तपास करून आरोपीस ताब्यात घेवुन गुन्हा उघड केलेबाबत"

----------oooooooooo----------

भिवंडी शहर पोलीस ठाणे हद्दीत दिनांक ११/०५/२०२६ रोजी १४-०० वा. चे सुमारास ते दिनांक १२/०५/२०२६ रोजी १५-०० वा. च्या दरम्यान फिर्यादी यांची पत्नी सौ. सरितादेवी विकास महतो वय ३३ वर्षे, हिस आरोपी संजय मुकादम उर्फ व्दारकाप्रसाद वर्मा याने त्याचेशी प्रेमसंबध ठेवत नाही तसेच फोनवर बोलत नाही या कारणावरून फिर्यादी यांचे पत्नी सौ. सरितादेवी विकास महतो हिस स्वतः राहत असलेल्या रूमवर बोलावुन घेवुन मयताने मोबाईल देण्यास नकार दिल्याने भांडण करून तिस दि. ११/०५/२०२६ रोजी दुपारी १५-०० वा. सुमारास जिवे ठार मारून रात्र होण्याची वाट पाहिली. त्यानंतर दि. १२/०५/२०२६ रोजी मध्यरात्री ०२-३० वा. सुमारास मयत महिलेला प्लॅस्टीक पोत्यामध्ये भरून खांद्यावरून दुर्गा प्रसाद हॉटेलजवळील मैदानात, पद्दमानगर, भिवंडी, जि ठाणे येथे मोकळ्या जागेत घेवुन जावुन कपडयाचे ताग्याचे कच्या धाग्याचा वापर करून जाळुन टाकुन पुरावा नष्ट केल्याने भिवंडी शहर पोलीस ठाणे, भिवंडी गुन्हा रजि. नं. ३०१/२०२६, भारतीय न्याय संहिता २०२३, कलम १०३, २८३, १२६, ३५१ प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

सदर घटनेची माहिती मिळताच गुन्हे शाखा, घटक - २, भिवंडीचे वपोनि/श्री. शितल राऊत व पथकाने तात्काळ घटनास्थळी भेट दिली. आरोपीबाबत प्रथमदर्शनी कोणताही पुरावा नसताना घटनास्थळाच्या आजुबाजुस असलेल्या पावरलुम कारखाना व दाट कामगार वस्तीमध्ये चौकशी करून, गुप्त बातमीदार तसेच तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे कौशल्यपूर्ण तपास करून आरोपी द्वारिकाप्रसाद गिरीधारीप्रसाद वर्मा उर्फ संजय मुकादम, वय ४२ वर्षे, सध्या राह. कमलेश उपाध्याय यांचा पावरलुम कारखाना, दुर्गा प्रसाद हॉटेलजवळ, पद्मानगर, भिवंडी, जि. ठाणे, मुळगाव - मु. भरकट्टा, खुर्जीयो, ता. पोलोनजिया, पो.स्टे. बिरनी, जि. गिरिडीह, झारखंड राज्य ८२५३२४ यास ताब्यात घेतले असुन आरोपीने नमुद गुन्हा केल्याची कबुली दिल्याने गुन्हयात अटक करण्यात आली आहे.

सदरची कामगिरी ही मा. डॉ. पंजाबराव उगले, अप्पर पोलीस आयुक्त, गुन्हे ठाणे शहर, मा. अमरसिंह जाधव, पोलीस उप आयुक्त, गुन्हे ठाणे शहर, व मा. शेखर बागडे सहा.पोलीस आयुक्त गुन्हे शोध १, ठाणे शहर यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, घटक- २ भिवंडीचे वपोनि श्री. शितल राऊत, सपोनि/श्रीराज माळी, सपोनि/मिथुन भोईर, पोउनि/रविंद्र बी. पाटील, पोउनि/राजेश शिंदे, पोउनि/रामचंद्र जाधव, सपोउनि/सुधाकर चौधरी, पोहवा/४४९० निलेश बोरसे, पोहवा/८३८ साबिर शेख, पोहवा/६९७३ सुदेश घाग, पोहवा/२०७६ प्रशांत राणे, पोहवा/४५४६ प्रकाश पाटील, पोहवा/६९६० वसंत चौरे, पोहवा/१९१९ रंगनाथ पाटील, पोहवा/२८१९ वामन भोईर, पोहवा/५५३४ किशोर थोरात, पोहवा/४६३३ शिवाजी मुर्तडक, पोशि/७७०० विजय कुंभार, पोशि/१५४७ नितीन नंदीवाले, पोशि/६२८३ सर्फराज तडवी, चापोशि/२०९३ रविंद्र साळुंखे व मपोहवा/६८३३ माया डोंगरे, मपोहवा/६७४० अनुष्का पाटील, मपोहवा/६८०० दक्षता सुतार, मपोहवा/७४९४ सायली गंभेरा यांनी केली आहे.